ISSN: 2249-894X IMPACT FACTOR : 5.2331(UIF) VOLUME - 6 | ISSUE - 11 | AUGUST - 2017

REVIEW OF RESEARCH

# प्रगति जिनविजय आणि जैन स्त्रिया



सौ. मेघा म. आलासे
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, महाराष्ट्र.

**सारांश : (Abstract)**

सांगली कोल्हापूर भागातील जैन समाज शेतीला प्राधान्य देणारा आहे. अहिंसेचा पुरस्कार करताना जगा आणि जगू दया हा मानवतेचा संदेश देणारा आहे. हा समाज धार्मिक रूढी परंपरेच्या बाबतीत अतिशय संवेदनशील आहे. रोज मंदिराला जाणे म्हणजेच धर्म करणे ही गोष्ट समाजाच्या मनात पक्की आहे. याचे पालन जैन स्त्रिया अतिशय कट्टरपणे करताना दिसतात. असे असतानाही आपली परखड मते या स्त्रियांनी ' प्रगति आणि जिनविजयाच्या 'अंकामध्ये समर्थपणे माडली आहेत. प्रगतिमधील त्यांचे विचार पाहता या स्त्रियांना स्वतःचे आत्मभान यायला लागले आहे. हे निश्चितच. पण तरीही याची संख्या खूप कमी आहे. आजचा जैन समाज शिक्षणाच्या दृष्टीने खूप पुढारलेला आहे. जैन स्त्रियाही यात पाठीमागे नाहीत पण तरीही या समाजाची वाचन संस्कृती वाढली पाहिजे. वाचन संस्कृती वाढली तरच स्त्रियांचे आत्मभान समाजाच्या सर्व स्तरावर विकासाला गती देणारी ठरेल यात शंका नाही.

**प्रस्तावना : (Introduction)**

खूप मौलिक असे योगदान आतापर्यंतच्या जैन समाजाच्या विकासाला दक्षिण भारत जैन सभेने दिले आहे. मुबंई इलाख्याचे पहिले अर्थमंत्री दिवाणबहादूर आण्णासाहेब लट्टे माजी आमदार श्रीमंती कळंत्रे आक्का यांच्या समकालीन दूरदृष्टी असणारे सर्वच नेते , दिग्गज मंडळी समाजाच्या प्रगतिसाठी कारणाभूत ठरलेली आहेत. 'प्रगति आणि जिनविजय' या नियतकालीकाचे महत्वही यादृष्टीने अनन्यसाधारण आहे. समाजातील सर्वसामान्य लोकांना लिहिते करण्याचे काम या नियतकालीकाने मोठ्या प्रमाणात केले. प्रत्येकाला आपलेसे वाटणारे हे नियतकालिक सर्वसामान्याच्या विचारांचे प्रागंणच ठरले. पूर्वीच्या अंगणात जसे घराचे प्रतिबिंब उमटायचे तसे समाजाचे प्रतिबिंब'प्रगति आणि जिनविजय' या नियतकालिकात उमटले. प्रत्येक जैन घरात पोहचलेले आणि स्वयंपाकघरात डोकावणारे हे नियताकालिक जैन स्त्रियांनाही नंतर जवळचे वाटू लागले . त्या काळात समाजातील स्त्रीचे स्थान दुय्यम दर्जाचे होते. चूल आणि मूल हे तिचे क्षेत्र निश्चित ठरलेले होते. त्याच वेळेला कुठेतरी दिवाणखान्यात तिला 'प्रगति आणि जिनविजय' या नियतकालिकाचे दुमडलेले एक पान दिसले. त्यातील अक्षर तिला ओळखीची नसतील आणि आपल्या गावची वाटलीही नसतील पण एवढे वाटले असेल आपण शिकले पाहिजे. आणि लिहिले पाहिजे ही मनातली शिक्षणाची उर्मी निर्माण करण्याचे महत्वाचे काम 'प्रगति आणि जिनविजयन' ने नक्कीच केलेले आहे. आणि म्हणून त्या दृष्टीने जैन स्त्रियांच्या वैचारिक वाटचालीमध्ये 'प्रगति आणि जिनविजय' चे काम खूप महत्वाचे आहे.

शिक्षणाच्या दृष्टीने आज जैन समाज खूप प्रगतीपथावर आहे. पण शंभर वर्षाच्या वाटचालीचा आढावा घेताना शंभर वर्षापूर्वी च्या समाजाला तितकासा तो सोपा आणि सुकर नव्हता. धर्म , मंदिर , महाराज यातच सधन घरातील जैन स्त्रिया गुरफटलेल्या

होत्या . तेच त्याचं विश्व होत . सुखाची श्रीमंती याच गोष्टीत ओंजळ भरुन वाहत होती . तृप्ततेची ढेकर देताना घर आणि मंदिर या पलिकडे काहीही दिसत नव्हते . तर सर्वसामान्य कुटुवातील स्त्री काबाडकष्ट करीत होती . घर आणि शेत हे तिचे क्षेत्र होते . मांज घरातले मिटलेले अश्रू तिच्याही वाटयाला आले होते . स्त्रिच्या वेदना तिच्या विश्वात गुरफटलेल्या काळात सौ . सुलोचना भोकरे यांनी स्वतःची लेखणी हातात घेतली . जैन समाजातील स्त्रियांनी शिकले पाहिजे . जागे झाले पाहिजे हीच तळमळ त्याच्या लेखणीतून जाणून लागली . आपले विचार मांडताना ते समाजाला पटतील की नाही यापेक्षा समाजाला ते विचार करायला लावतील याचेच भान त्यांनी लेखणीत ठेवले . महिला अधिवेशनासाठी पुढाकार घेतला आणि त्यात आपली परखड मते मांडली . हा आत्मविश्वास त्यांना प्रगतिनेच दिला प्रगतिच्या त्या पहिल्या जैन महिला सहसंपादिका झाल्या .

समाज कुठलाही असू दे सगळीकडे स्त्रियांचे दुःख ठिवकणारी वेदना ही सारखीच असते . स्त्रियांना काय कळते ही समाजाची चुकीची धारणा समान पातळीवर काम करते आणि त्यावर सुखी कुटुबांचा घरसंसार उभा राहतो . घराच्या सुखासाठी झटणा-या स्त्रिया हया केरसुणीसारख्याच ठरतात . सगळयांच्या सुखासाठी घरभर पळायच काम संपल की कोप-यात बसायच . स्त्रियांच्या मनात ही उमटणारी पण न दिसणारी रेषा नकळतपणे प्रगतिमध्ये अधोरेखीत झाली आहे . ब-याचजणांनी तिला दुजोरा दिलेला आहे . काहींनी विरोध केलेला आहे . आपल्या मनातील ही उमटणारी रेषा समाजाला कळली तर स्वतःच्या धार्मिक व्यक्तिमत्वाला तडा जाई ल . कुटुंबाचा अपमान होईल . नव-याचा सन्मान कमी होईल याची भीती कितीतरी स्त्रियांना झालेली आहे . प्रगतिचे यामध्ये सुध्दा यशच आहे . कारण हा दवलेला, घावरलेला चेहरा सन्मानाने प्रगतीमध्ये समाविष्ट झालेले आहे .

सौ . सुलोचना भोकरे प्रा . सौ . लिलावती जैन , सौ . वासंती शहा , डॉ . विजयालक्ष्मी पांगळ या सर्वांनी समाजातील चुकीच्या रूढी परंपरा , प्रथेवर जोरदार प्रहार केलेला आहे . समर्थपणे त्यांच्या लेखणीने हे आव्हान पेललेले आहे . धर्म ,मंदिर ,महाराज या गोष्टी जैन समाजाच्या अत्यंत जिव्हाळयाच्या गोष्टी आहेत . यावर बोलताना जैन समाजातील पुरुषसुध्दा विचार करुन बोलतो . समाजाचा रोष ओढवून न घेता जगता आले पाहिजे हा त्या पाठीमागचा हेतू असतो . पण प्रगतीच्या स्त्री लेखिकांनी अतिशय बाणेदारपणे समाजाचा विरोध पत्करुन प्रगतीमध्ये लेखन केलेले आहे . 'कळसा' हे प्रकरण प्रा . वासंती शहा यांनी अत्यंत संयमाने , धाडसाने तोललेले आहे . यामुळेच कर्मकांडामध्ये अडकलेला समाज आणि त्यामुळे समाजाची होणारी हानी यानी अस्वस्थ झालेली स्त्री लेखणी यांचे मार्मिक चित्रण प्रगतिमध्ये पहायला मिळते . चुकीच्या गोष्टीवर प्रहार करताना चांगल्या धार्मिक गोष्टीवर , तत्वावर , पुस्तकांवर सुंदर विवेचन सुदधा या लेखिकांनी केलेले आहे हे विशेष . यावरून त्यांची अभ्यासू लढाऊ आणि चिंतनशील वृत्ती दिसते .

प्रगतिमध्ये स्त्रियांनी वैचारिक , सामाजिक स्त्री विषयक लेखन करताना कथा आणि कवितांचे सुदधा लेखन केलेले आहे . पण मराठी साहित्यात ठळकपणे उठून दिसावे असे लेखन प्रगतिमध्ये झालेले नाही . आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी 'प्रगती आणि जिनविजय' हे त्यांना व्यासपिठ मिळाले . व्यासपिठावर येताना वाचनाचा व्यासंग त्यानी बाजूला ठेवला . जगण्यातल्या विसाव्याचा . आनंदाचा एक छानसा झोका त्यांनी या व्यासपिठावर घेतला . अभ्यासूपणाचे दर्शन दिले . आपल्या शब्दांच्या उमलत्या वयात परिमलाचे सुख त्यांनी छोटयाशा लेखणीतून शोधले . आपल्यापरीने ग्रंथपरीक्षण केले . प्रवासवर्णने, व्यक्ती चित्रणे रेखाटली . स्त्री विषयक सदर चालविले . बालसंगोपणाचा धडा दिला . कथेची बांधणी करताना धार्मिक कथांचा आधार घेतला . भावनारूपी शब्द बांधताना कवितेला गंधित केले . जसे जमेल तसे त्या लिहित राहिल्या . त्यांचे बोबडे बोल अडखळणारे शब्द यांचे कौतुक प्रगतिने केले .

जैन पुरूषांच्या तुलनेने जैन स्त्रियांनी खूप कमी लेखन प्रगतिमध्ये केलले आहे . वेगवेगळया भागात राहर्णाया स्त्रिया आपल्या भागाचे वेगळेपण शब्दात पकडू शकल्या नाहीत . विविध प्रकारात अनेक लेखिकांनी विपुल लेखन केले आहे . या लेखनातून समाजाची जनजागृती आणि प्रबोधन झाले . त्यांच्या लेखणीला संशोधनावृत्तीची जोडसुद्धा मिळाली .

'प्रगति आणि जिनविजय' हे जैन समाजातील एक महत्वाचे नियतकालिक जैन घराघरात आणि मनामनात पोहचलेले आहे . या नियतकालिकाने जैन स्त्रियांच्या विचारांना नवी दृष्टी दिली . सामाजिक जाणिवा त्यांच्या काळजापर्यत पोहोचवल्या रिकाम्या वेळेचा सदुपयोग कसा करायचा हे शिकविले . शब्दांची ओळख दिली . माणसांची पारख शिकवली . धर्माचे तत्वज्ञान दिले . स्त्री म्हणून स्वतःच्या अस्मितेचा सन्मान केला . स्त्रीत्वाची जपणूक केली . लढण्यासाठी प्रवृत्त केले . कर्नाटकाच्या सीमेवर वसलेल्या दक्षिण महाराष्ट्रातील जैन स्त्रियांना बाईपणाचा मोकळा श्वास दिला .